# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/११/२०२३ (सोमवार)

---

**गोंडखैरी पारधी बेडा येथील अवैध्य दारू भट्टीवर छापे ०१ लाख ८३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**कळमेश्वर पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची संयुक्त प्रतिबंधक कारवाई**

कळमेश्वर पोलिस स्टेशन हद्दीतील गोंडखैरी येथील पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून तिची मोठ्या प्रमाणावर आजुबाजुचे परीसरात विक्री होत असल्याची गोपनिय खबर कळमेश्वर पोलिसांना मिळाल्याने मा. पोलिस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), मा. अपर पोलिस अधिक्षक श्री डॉ. संदिप पखाले, मा. उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अजय चांदखेडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक प्रभारी ओमप्रकाश कोकाटे यांचेसह पोलिस स्टेशन कळमेश्वरचे प्रभारी अधिकारी श्री. यशवंत सोळसे यांचे नेतृत्वाखाली आज दिनांक २७/११/२०२३ रोजी पहाटे ०७.०० वा. सुमारास पोलिस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी पारडी बेडा येथे सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर छापे मारून एकुण जवळपास **१८३०००/—** रूपयाचा मुद्देमाल जप्त करून एकुण ०८ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये कारवाई करण्यात आली आहे. सर्व आरोपीतांवर पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे दाखल करण्यात आले असुन सदर कारवाई दरम्यान एकुण ८१०० लिटर कच्चे रसायन सडवा किंमती १८३००० हजार रू., जप्त करण्यात आली असून दारूभट्टी साठी लागणारे इतर साहित्य ड्रम, घमेले व दारू तयार करणेकामी लागणारे साहीत्य दारूच्या भट्टया उद्धवस्त करण्यात आल्या आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री हर्ष पोद्दार सर, अपर पोलीस अधीक्षक संदीप पखाले, यांचे मार्गदर्शनात व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री चांदखेडे, यांचे उपस्थितीत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक श्री पांडे, व २५ पोलीस अंमलदार तसेच कळमेश्वर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक श्री यशवंत सोलसे, सहायक पोलीस निरीक्षक श्री पोटभरे, मेंश्राम महीला पोलीस उपनिरीक्षक गेडाम, व २८ अंमलदार, तसेच आर सी पी पथकातील १५ अंमलदार, सावनेर विभागातील १० अंमलदार असे एकुण ७ अधिकारी व ७८ पोलीस अंमलदार मिळुन सदर कारवाई केली.

सदर कारवाईचा फोटो सोबत जोडलेला आहे.

## खुन

**पोलीस स्टेशन रामटेक** :– अंतर्गत मौजा गडमंदीर रोड रामटेक, दिनांक २६.११.२३ चे ०५.३० वा. ते ०६.३० वा दरम्यान, यातील फिर्यादी चा मुलगा मृतक नामे– **विवेक विश्वनाथ खोब्रगडे** वय २१ वर्ष हा व त्याचा मित्र फैजान खान रा पवनी याचे सोबत त्याचे मोटर सायकल ने रामटेक येथे शोभायात्रे चा कार्यक्रम करीता आले होते, कार्यक्रम संपवुन गडमंदीर रामटेक वरुन मोटर सायकल ने डबल सिट घरी परत येत असता, गडमंदीर रोड वर त्याला आरोपी मनिष भारती व त्याचे मित्राने त्याची मोटर सायकल थांबवुन **"आमची मोटर सायकलला ठोस लागली " असे म्हणुन हातबुक्की ने लाताबुक्कीने मारहान केली**. तसेच तुम्ही मुस्लीम व महार जाती चे असल्यानंतर इथे कशाला आले ? असे म्हणुन धमकी दिली. काही वेळाने फैजल चा भाउ तिथे आल्यानंतर मनिष भारती नावाचा इसमाने त्याचे गाडीचे नुकसान झाल्याचे सांगुन फैजल च्या भावाकडुन १०,०००/रु घेतले. फैजल व विवेक यांना गाडी चालवणे होत नसल्याने व ते घाबरले असल्याने पोस्टे ला तक्रार देण्यास न येता दोघेही गाडी ने परत आले. दि २६.११.२३ रोजी सकाळी ०६/०० वा फिर्यादी कामावरुन घरी परत आला, तेव्हा मुलगा विवेक याला मार लागल्याचे पाहुन त्याला उपचार कामी डॉ सुधीर नाकले रा पवनी यांचे दवाखान्यात नेले तेथुन रेफर केल्याने चौधरी हॉस्पीटल कामठी येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी **तपासुन मरण पावल्याचे सागितले**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विश्वनाथ गोवर्धन खोब्रागडे वय ५१ वर्ष रा. सितापुर देवलापार ता.रामटेक जि.नागपुर मो.नं .९७६३९०७८०९ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी क्र १) मनिष बंडुजी भारती वय ३७ वर्ष २) जितेद्र गजेंद्र गिरी वय २३ वर्ष ३) सत्येंद्र गजेंद्र गिरी वय २५ वर्ष तीन्ही रा. अंबाडा वार्ड रामटेक जि. नागपुर यांना सदर गुन्हयात अटक करून त्यांचेवर कलम ३०२,३४१,३२३,५०४, ५०६, ३४ भादवी सह कलम ३(२) (पाच) अनुसुचित जाती जमाती प्रतीबंधक कायदा अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करून तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री आशित कांबळे रामटेक विभाग मो.न. ९४०३६४७५७३ हे करीत आहेत.

## फुस लावुन पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन जलालखेडा :– अंतर्गत** मौजा जलालखेडा ०१ किमी उत्तर, यातील फिर्यादी यांची मुलगी **वय १७ वर्ष ११ महीने** ही घरून **कॉम्पुटर कोर्स लावण्यासाठी देवांश कॉम्पुटर जलालखेडा येथे दि.२६.११.२३ रोजी १२.०० वा दरम्यान घरून निघाली असता अदयाप पावेतो घरी परत आली नाही**, कोणीतरी अज्ञात ईसमाने आमीष दाखवुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फिर्यादीचे मुलीला **पळवुन नेले**

सदर प्रकरणी फिर्यादी रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३६३ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनीरीक्षक श्री जोशी सा पोस्टे जलालखेडा मो नं ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

<u>अकस्मात मृत्यु</u>

**<u>पोलीस स्टेशन सावनेर</u>** :— अंतर्गत मौजा कृषी मंडी जवळ सावनेर ०१ किमी पुर्व, दिनांक २६/११/२३ चे १८/०० वा दरम्यान, यातील मृतक नामे — कन्हैयालाल थावरदास चंदवानी वय ६७ व ा रा. गुजरखेडी सावनेर हे संध्याकाळी १८/०० वा दरम्यान ऑटोने गुजरखेडी येथुन सावनेर कडे येत असता कृ ी मंडी जवळ सावनेर त्यांची **अचानक प्रकृती खराब झाल्यांने** त्यांना उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे आणले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रिंकी शामालाल चंदवानी वय ३२ वर्ष रा.वार्ड क्र ३ रेल्वे स्टेशन रोड सावनेर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे सावनेर येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला असुन सदर मर्ग चा तपास स.फौ राजेंन्द्र यादव मो नं ९४२३६०२९८७ हे करीत आहेत.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**